Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्यापनातील नवप्रवाह : समस्या निराकरण पद्धती

**प्रा.श्रीमती प्रतिभा गोपाळ जगताप,**

**अध्यापक विद्यालय, दिंडोरी, नाशिक.**

**प्रस्तावना :-**

आजचे 21 वे शतक हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक क्षणाक्षणाला विद्यार्थ्यांना लहान-मोठ्या समस्यांना सामोरे जावे लगत आहे. फक्त सामाजिक वातारवणामध्ये विद्यार्थ्यांना समस्या जाणवतात असे नाही तर त्यांचे शैक्षणिक वातावरण, कौटुंबिक वातावरण इ. मध्ये सुध्दा समस्या जाणवतात. याच कारणामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून शास्त्रयुक्त पद्धतीने समस्या सोडविण्याचे प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. याचाच प्रयत्न शिक्षक समस्या निराकरण पद्धती वापरुन करीत असतात.

नवीन माहिती जाणून घेणे हा विद्यार्थ्यातील एक महत्त्वाचा गुण आहे. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न तयार होतात. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांची सतत धडपड चालू राहते. त्यांच्या जिज्ञासा पूर्ततेसाठी ते सतत प्रयत्न करत असतात. यासाठीच त्यांना विद्यार्थीदशेतच कसा विचार करावा, कशा समस्या सोडवाव्यात याचे ज्ञान प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. या ज्ञानप्राप्तीच्याच जोरामुळे ते भविष्यात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करु शकतील असे वाटते. प्रस्तुत लेखात समस्या निराकरण पद्धतीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**समस्या निराकरण पद्धत - संकल्पना:**

समस्या निराकरण ही एक अशी पद्धती आहे जेथे शिक्षक आणि विद्यार्थी जाणीवपूर्वक, नियोजित आणि हेतूपुरस्सर एखाद्या शैक्षणिक समस्येवर उपाय किंवा स्पष्टीकरण शोधत असतात. समस्या निराकरण पद्धतीमध्ये पाठ्यवस्तू समस्यास्वरुपात विद्यार्थ्यांसमोर मांडून त्या समस्येचे किंवा कूट प्रश्नाचे उत्तर शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले जाते. समस्या निराकरण पद्धतीद्वारा विद्यार्थ्यांतील जिज्ञासूवृत्ती जागृत करुन त्यांच्या विचारशक्तीचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

समस्या निराकरण पद्धतीबाबत Yoakam आणि Simpson यांनी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

'A problem accurs in a situation in which a felt difficulty to act is realized. It is a difficulty that is clearly present ans recognized by the thinker. It may be purely mental difficulty or it may be phyxical and involve the manipulation of data. The individual recognizes it as a challenge'.

Yoakam and Simpson

समस्या निराकरण पद्धतीस समस्या परिहार असे म्हटले जाते. विद्यार्थी एखादे ध्येय समोर ठेवून त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करीत राहतो व तेव्हा त्याच्या ध्येयपुर्तीमध्ये काही अडचणी निर्माण होतात. या अडचणींचीच म्हणजे समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न या पद्धतीमध्ये केला जातो.

समस्या निराकरण पद्धती ही फक्त अध्यापन पद्धती नसून यामध्ये पाठ्यवस्तूचे व्यवस्थापन करुन, पाठ्यवस्तू विद्यार्थ्यांसमोर समस्यारुपाने मांडली जाते व विद्यार्थ्यांना ही समस्या सोडविण्यास प्रवृत्त केले जाते. समस्या निराकरण पद्धतीमध्ये विमर्शी विचारप्रक्रिया अंतर्भूत असते.

**समस्या निराकरण पद्धतीची उद्दिष्टे :**

1. विद्यार्थ्यांना विचारशक्तीस चालना देणे.
2. विद्यार्थ्यांना नावीण्यपूर्ण वातारवणास तोंड देण्यास समर्थ बनविणे.
3. शास्त्रीय पद्धतीने समस्या सोडविण्याची सवय लावणे.
4. विद्यार्थ्यांमधील तार्किक विचारसरणीस प्रोत्साहन देणे.
5. विद्यार्थ्यांना स्वअनुभवाद्वारे ज्ञानप्राप्तीस प्रेरणा देणे.
6. एखाद्या समस्येबाबत बहुअंगाने विचार करण्याची सवय लावणे.
7. अभ्यासाची चांगली सवय लावून विषयात गोडी निर्माण करणे.

सदर उद्दिष्ट्यांचा प्रयत्न शिक्षकांनी समस्या निराकरण पद्धतीची अंमलबजावणी करतांना करावा. विद्यार्थ्यांसमोर फक्त एखादी समस्या निर्माण करुन ती सोडविणे एवढ्यापुरतीच ही पद्धती मर्यादित नाही. समस्या निराकरण करीत असतांनाच विद्यार्थ्यांच्या वैचारिक पातळीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - “ Pedagogy And Teaching Learning ”

**समस्या कशी असावी? Essential Features of a problem:**

विद्यार्थ्यांसमोर पाठ्यवस्तू समस्यात्मक स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न समस्या निराकरण पद्धतीत केला जातो. विद्यार्थ्यांसमोर समस्या मांडीत असतांना समस्येची प्रामुख्याने पुढील लक्षणे विचारात घ्यावीत.


**चांगल्या समस्येची**

- स्पष्टपणे मांडलेली असावी
- विद्यार्थ्यांमध्ये ती समस्या सोडविण्याची जिज्ञासा निर्माण
- जीवनाशी संबंधित असावी.
- विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वत: तिचे निराकरण करण्याजोगी असावी.
- समस्येबाबत विद्यार्थ्यांना थोडासा तरी पूर्वानुभव असावा.
- शक्य असेल तर इतर विषयांशी सहसंबंध असावा.
- अर्थपूर्ण असावी.

विद्यार्थ्यांसमोर कोणतीही समस्या मांडतांना ती समस्या वरील सर्व निकष पूर्ण करते का? याचा विचार शिक्षकाने करावा तरच समस्या निराकरण पद्धतीचे आयोजन यशस्वी करता येईल.

**समस्या निराकरण पद्धतीचे वैशिष्ट्ये :-**

समस्या निराकरण पद्धतीच्या स्वरुपात या पद्धतीची काही वैशिष्ट्ये दिसून येतात. ती खालील आकृतीच्या सहाय्याने असून त्याचे महत्त्व लक्षात येते.




वरील समस्या निराकरण पद्धतीची वैशिष्ट्ये सांगता येतील.

**समस्या निराकरण पद्धतीची कार्यवाही :**

समस्या निराकरण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांसमोर पाठ्यवस्तू समस्यात्मक स्वरुपात मांडली जाते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर समस्या स्पष्टपणे मांडून त्या समस्यांचे निराकरण करण्यापर्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची असते. ही भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी साधारणत: पाच पायऱ्या विचारात घेतल्या जातात.

**समस्या निराकरण पद्धतीच्या पाच पायऱ्या:**

1. समस्येची मांडणी निवड.
2. समस्येसंबंधी माहिती संकलन.
3. निष्कर्ष काढणे.
4. माहितीचे संघटन, विश्लेषण व परीक्षण.
5. निष्कर्षांची फेरतपासणी

**समस्या निराकरण पद्धतीचे फायदे :**

समस्या निराकरण पद्धती ही विद्यार्थ्यांच्या प्रक्रियेस चालना देणारी एक महत्त्वपूर्ण पद्धती आहे. विशिष्ट अध्यापनपुरतीसाठीच ही पद्धत मर्यादित नसून भविष्यात जीवनावर कशी मात करावी याबाबत ही मार्गदर्शन या पद्धतीत केले जाते. या पद्धती फायदे खालीलप्रमाणे.

1. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीस योग्य दिशा देण्याचे कार्य.
2. ही पद्धती विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास वाव देणारी आहे.
3. ज्ञानामध्ये सुधारणा घडवून आणण्यास मदत करते.
4. अभ्यासासाठी चागंल्या सवयी लावण्यास उपयुक्त आहे.
5. चर्चेमधून आत्मप्रकटीकरणास चालना मिळते.
6. चर्चेमध्ये विविध विद्यार्थ्यांना मताद्वारे, एकाच समस्येची बहुअंगी दृष्टिकोनातून चर्चा घडवून आणली जाते.
7. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या चर्चेून त्यांची मनोवृत्ती जाणता येते
8. मनोरंजकेतने अध्ययन केले जाते.
9. नवीन परिस्थितीमध्ये वर्तन कसे आहे याबाबत माहिती प्राप्त होते.
10. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा आनंद मिळतो.
11. शिस्त राखली जाते त्यावेळेस विद्यार्थी उत्तरे शोधण्यात मग्न असतो.
12. जो विषय असतो त्याबाबत अभिरुची तयार होते.
13. समायोजन क्षमता त्यांची गट कार्यात घेत्लयाने वाढते.
14. विद्यार्थ्याला त्याच्या बारीकसारिक चौकशीला वाव मिळतो.

**समस्या निराकरण पद्धतीमध्ये शिक्षकाची भूमिका :**

शिक्षकाने समस्या निराकरण पद्धतीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडणे महत्त्वाचे असून पूर्वनियोजनापासून ते निष्कर्षांची पाहणी करण्यापर्यंत त्यांना त्यांची भूमिका पार पाडावी लागते. एक चांगला व उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून शिक्षकांने खालील भूमिका पाडाव्यात.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "


1. विद्यार्थ्यांसमोर ज्या भूमिका मांडाव्याच्या आहेत त्याचे पूर्वनियोजन करावे.
2. विद्यार्थ्यांसमोर समस्या सुस्पष्टपणे मांडव्यात.
3. त्यांच्या समस्या सोडविण्याची गरज, जिज्ञासा निर्माण करावी.
4. विद्यार्थ्यांना समस्येबाबत माहिती संकलनास उत्तेजित करावे.
5. संकलित केलेल्या माहितची चर्चा करावी.
6. संकलित झालेल्या माहितीचे निष्कर्ष व विश्लेषण याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे.
7. संघटीत झालेल्या माहितीचे निष्कर्ष तपासून किंवा पडताळूण पाहावे.
8. शास्त्रीय दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे कार्य करावे

अशा प्रकारे शिक्षकांनी समस्या निराकरण पद्धतीत आपली भूमिका पार पाडावी.

**समस्या निराकरण पद्धतीत विद्यार्थ्यांची भूमिका :**

समस्या निराकरण पद्धतीमध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची जरी असली तरी त्यात विद्यार्थ्यांची भूमिका पण महत्त्वाची आहे. शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांनी आपली भूमिका चांगल्यारितीने पार पाडली तर खरचं या पद्धतीची अंमलबाजवणी चांगली होईल.

**विद्यार्थ्यांनी पुढील भूमिका पार पाडाव्यात.**



Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

अशा पद्धतीने समस्या सोडविण्याची जिज्ञासा मनात निर्माण करण्यापासून ते त्यांच्या निष्कर्षांची तपासणी करेपर्यंत विद्यार्थ्यांनी आपली भूमिका पार पाडावी.

**संदर्भ :**

१. चव्हाण, गणेश (२००९) अध्ययन अध्यापन : पारंपरिक ते आधुनिक, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
२. करंदीकर, सुरेश (२००६) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. कुलकर्णी, के. वी. (१९९९) शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीविदया प्रकाशन, पुणे.
४. कुंडले, म. बा. (२००५) अध्यापनशास्त्र आणि पध्दती, व्हीनस प्रकाशन, पुणे.
५. www.buzzle.com
६. www.en.wikipedia.com
७. www.teach- nology.com